आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

८ जून २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते ७ कीर्ती चक्र, १५ वीर चक्र आणि २९ शौर्य चक्र देऊन वीर सैनिकांचा गौरव
- इंडिया आघाडीच्या नवी दिल्लीत झालेल्या बैठकीला २५ पक्षांचे नेते उपस्थित
- विशाखापट्टणममध्ये स्टील प्रकल्पात झालेल्या दुर्घटनेत ८ जणांचा मृत्यू, ६ जण जखमी, प्रधानमंत्र्यांकडून आर्थिक मदत जाहीर
- फिलिपिनमधे झालेल्या भूकंपात किमान ३२ जणांचा मृत्यू, २०० हून जास्त जखमी

**आणि**

- न्यू चंदिगड इथं झालेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताचा अफगाणिस्तानवर एक डाव आणि ३०० धावांनी विजय

**<><><><><>**

देशाच्या संरक्षणासाठी तैनात असलेल्या जवानांना कर्तव्य बजावताना दाखवलेल्या अदम्य धैर्य आणि शौर्यासाठी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते विविध शौर्य पदकं प्रदान करण्यात आली. नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात झालेल्या या सोहळ्यात राष्ट्रपतींनी संरक्षण दल, केंद्रीय सशस्त्र पोलीस दल आणि राज्य तसंच केंद्रशासित प्रदेश पोलीस दलातल्या जवानांना ७ कीर्ती चक्र, १५ वीर चक्र आणि २९ शौर्य चक्रं प्रदान केली. लेफ्टनंट कर्नल आदित्य घाटगे, आणि पोलीस सेवेतले निरीक्षक रामेश्वर देशमुख यांना शौर्यचक्र प्रदान करण्यात आलं. तर सैन्यदलात शिपाई म्हणून असलेले प्रवीण जंजाळ यांना मरणोत्तर कीर्ती चक्र प्रदान करण्यात आलं.

**<><><><><>**

देशभरातल्या शंभर औद्योगिक पार्कचा विकास करण्यासाठी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज भव्य पोर्टलचं उद्घाटन केलं. कामगारस्नेही पायाभूत सुविधा, विश्वसनीय प्रणाली, डिजिटल प्रशासन यंत्रणा असणारी एकात्मिक औद्योगिक परिसंस्था तयार करणं हे या पोर्टलचं उद्दिष्ट आहे, असं गोयल यांनी नवी दिल्लीत आयोजित कार्यक्रमात सांगितलं. गुंतवणूकस्नेही औद्योगिक पायाभूत सुविधा तयार करून भारताच्या उत्पादन परिसंस्थेला बळकट करण्यासाठी हा उपक्रम  उपयोगी आहे, असं त्यांनी सांगितलं. भव्य पोर्टलच्या खर्चासाठी सरकारने ३३ हजार ६६० कोटी रुपये मंजूर केले आहेत.

**<><><><><>**

येत्या २१ जून रोजी होणाऱ्या नीट-यूजी २०२६ च्या फेरपरीक्षेसाठी केंद्रांची यादी जाहीर झाली आहे. ही परीक्षा देशातल्या ५५१ केंद्रांवर दुपारी २ ते सव्वा पाच या वेळात लेखी पद्धतीनं होणार असून परदेशातल्या १४ शहरांमध्येही होणार आहे. प्रवेशपत्र आणि इतर माहितीसाठी विद्यार्थ्यांनी अधिकृत संकेतस्थळाशी संपर्कात राहण्याचं आवाहन एनटीएनं केलं आहे.

**<><><><><>**

इंडिया आघाडीनं आज नवी दिल्लीत बैठक घेऊन विविध विषयांवर चर्चा झाली, त्यात प्रत्येकानं आपली मतं मांडली, असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी सांगितलं, काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, काँग्रेस नेते राहुल गांधी, तृणमूल काँग्रेसच्या अध्यक्ष ममता बॅनर्जी, समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव, नॅशनल कॉन्फरन्सचे ओमर अब्दुल्ला, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्यासह २५ पक्षांचे नेते या बैठकीला उपस्थित होते. महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे या बैठकीत दूरदृष्य प्रणालीद्वारे सहभागी झाले. दर दोन महिन्यांनी अशी बैठक घेण्यावर सर्वांचं एकमत झालं. त्यानुसार पुढची बैठक हैदराबादला होणार आहे, असं खर्गे यांनी सांगितलं.

दरम्यान, २०२९ च्या लोकसभा निवडणुकीसाठी प्रधानमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर केला पाहिजे, असं मत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी मांडलं आहे. हेच मत उद्धव ठाकरे यांचं असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

तृणमूल काँग्रेसचे राज्यसभा सदस्य सुखेंदू शेखर राय यांनी आज आपल्या राज्यसभा सदस्यत्त्वाचा राजीनामा दिला. राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी तो स्वीकारला असल्याचा आणि ती जागा रिक्त झाल्याचं राज्यसभा सचिवालयाने सांगितलं आहे. राज्यसभेत माझा कार्यकाळ २०२९ पर्यंत होता, पण पुढे काम करणं मला अवघड झाल्यामुळे मी पक्षातून तत्त्वतः राजीनामा दिल्याचं राय यांनी या आधी सांगितलं होतं.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशात विशाखापट्टणम जिल्ह्यामध्ये वायझॅग स्टील प्लांट इथे वितळलेलं लोखंड अंगावर सांडल्यानं ८ जणांचा मृत्यू झाला असून ६ जण जखमी झाले आहेत. क्रेनच्या माध्यमातून वितळलेलं लोखंड दुसरीकडे नेत असताना ही दुर्घटना घडली. मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून संबंधित सर्व विभागांनी सन्मवयाने मदत करण्याचे आदेश दिले आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेविषयी दुःख व्यक्त केलं असून जखमींना लवकरात लवकर बरं व्हावं अशा सदिच्छा दिल्या आहेत. तसंच, प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपयांची तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे.

**<><><><><>**

फिलिपिनमधे आज सकाळी झालेल्या भूकंपात किमान ३२ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून जास्त जखमी झाले. फिलिपीनच्या दक्षिण समुद्रकिनारी भागात झालेल्या

या भूकंपाची तीव्रता ७ पूर्णांक ८ दशांश रिक्टर इतकी होती. भूकंपानंतर त्सुनामी आल्यानं अधिक नुकसान झालं. त्सुनामीचे धक्के इंडोनिशिया, पलाऊ आणि दक्षिण जपानपर्यंत जाणवले.

**<><><><><>**

पश्चिम आशियात इराण आणि इस्राएलने आज ८ एप्रिलच्या युद्धविरामानंतर परस्परांवर हल्ले सुरू केले आहेत. शस्त्रसंधीनंतर इराणने इस्रायलवर काल पहिल्यांदाच क्षेपणास्त्र हल्ला केला. या घटनेनंतर इराणच्या हल्ल्यांना इस्राएलने प्रत्युत्तर देऊ नये असं आवाहन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी केलं होतं. शस्त्रसंधी कायम ठेवून दोन्ही देशांनी वाटाघाटी आणि संवादाच्या मार्गाने पुढे जावं असं आवाहन त्यांनी पुन्हा एकदा केलं आहे. मात्र तो सल्ला न जुमानता इस्राएलने इराणवर प्रतिहल्ला चढवला आहे. या हल्ले प्रतिहल्ल्यांमुळे पश्चिम आशियातला तणाव पुन्हा एकदा वाढला आहे. यमनमधल्या हुथी बंडखोरांनी युद्धात उडी घेतली असून इस्राएलवर हल्ले करायला सुरुवात केली आहे.

दरम्यान आपण आक्रमण थांबवत असल्याचं इराणच्या सेनादलांनी जाहीर केलं आहे. मात्र इस्राएल किंवा इस्राएलच्या समर्थकांनी दक्षिण लेबनॉनसह कुठेही आक्रमण केलं तर आतापेक्षा जास्त गंभीर परिणाम होतील, असं इराणने स्पष्ट केलं आहे.

या परिसरात हवाई वाहतुकीत अडथळे निर्माण झाले असून इराक आणि सीरियाने आपापल्या हवाई हद्दी बंद केल्या आहेत.

दरम्यान, इराणमधल्या भारतीयांनी लौकरात लौकर देश सोडावा असा सल्ला परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने जारी केला आहे.

**<><><><><>**

आर्मेनियामधे झालेल्या संसदीय निवडणुकीत सत्ताधारी सिव्हिल काँट्रॅक्ट पक्षाला बहुमत मिळालं आहे. प्रधानमंत्री निकोल पशिनयान यांच्या नेतृत्वाखाली पक्षानं ४९ पूर्णांक ८ दशांश टक्के मतं मिळवली. स्ट्राँग आर्मेनिया अलायन्स ही आघाडी २३ पूर्णांक २ दशांश टक्के मतं मिळवून दुसऱ्या क्रमांकावर राहिली, तर आर्मेनिया अलायन्स केवळ ९ पूर्णांक ९ दशांश टक्के मतं मिळवू शकला. आर्मेनियाचे संबंध पाश्चात्य देशांबरोबर वाढवण्याच्या प्रयत्नांना मतदारांनी कौल दिल्याचं मानलं जात आहे. निवडणुकीतल्या विजयाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आर्मेनियाचे प्रधानमंत्री निकोल पशिनयान यांचं अभिनंदन केलं आहे. भारत-आर्मेनिया संबंध अधिक दृढ व्हवेत याकरता त्यांच्याबरोबर एकत्र काम करण्याची इच्छा मोदी यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

न्यू चंदीगड इथं झालेल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारतानं आज तिसऱ्याच दिवशी अफगाणिस्तानवर एक डाव आणि ३०० धावांनी विजय मिळवला.

भारतानं कर्णधार शुभमन गिलच्या १२६, के एल राहुलच्या १००, साई सुदर्शन आणि ऋषभ पंत यांच्या प्रत्येकी ८१, आणि वॉशिंग्टन सुंदरच्या नाबाद ५२ धावांच्या जोरावर ८ बाद ५६४ धावांवर पहिला डाव काल घोषित केला होता. या धावसंख्येचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा पहिला डाव आज १५२ धावांवर आटोपल्यावर, भारतानं त्यांना फॉलोऑन दिला. मात्र अफगाणिस्तानला दुसऱ्या डावातही चांगली कामगिरी करता आली नाही, ३६ व्या षटकातच त्यांचा संघ ११२ धावात गारद झाला. भारतातर्फे दुसऱ्या डावात वॉशिंग्टन सुंदरनं ४, कुलदीप यादवनं ३, तर मानव सुतार आणि महंमद सिराज यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. मानव सुतारनं पदार्पणातच सामन्यात ७ बळी घेतले. तोच सामनावीर ठरला.

**<><><><><>**

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना लागू करणारं पश्चिम बंगाल हे देशातलं ३६वं राज्य आणि केंद्रशासित प्रदेश ठरलं आहे. यात प्रतिकुटुंब वार्षिक ५ लाख रुपयांपर्यंतचं आरोग्य संरक्षण मिळतं. राज्यात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण आणि पश्चिम बंगाल सरकारने आज नवी दिल्लीत सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली.

**<><><><><>**

ऑल इंडिया रेडियोला आज नव्वद वर्ष पूर्ण झाली. आजच्याच दिवशी, ८ जून १९३६ रोजी इंडियन स्टेट ब्रॉडकास्टिंग सर्व्हिसचं नाव बदलून ऑल इंडिया रेडिओ ठेवण्यात आलं. स्वातंत्र्यानंतर ऑल इंडिया रेडिओचा वेगाने विस्तार झाला आणि १९५६-५७मध्ये आकाशवाणी हे नाव या संस्थेला मिळालं. आज आकाशवाणीची ५९१ केंद्र देशभरात कार्यरत आहेत. देशाच्या ९८ टक्के लोकसंख्येपर्यंत विस्तारलेली रेडिओ सेवा २३ भाषा आणि १४६ बोलीभाषांमधून प्रसारित होते. तसंच आकाशवाणीचा बाह्य सेवा विभाग १०० पेक्षा जास्त देशांमध्ये प्रसारित होतो आणि परदेशातल्या भारतीयांशी संवाद साधतो.

बहुजन हिताय, बहुजन सुखाय या आपल्या ध्येयवाक्याला अनुसरून आकाशवाणी वृत्तसेवा विभाग काम करत आहे. रेडिओ वार्तांकन क्षेत्रात व्यावसायिक नीतिमत्ता आणि मानकांचं पालन करून देशातल्या प्रत्येक नागरिकापर्यंत सर्व प्रमुख भाषा आणि बोलीभाषांमधून बातम्यांचं प्रसारण करण्यासाठी आकाशवाणी सदैव प्रयत्नशील आहे.

**//<><><><><>//**